# कार्यकारी सारांश

**अ) पूर्वपीठीका-**

मा. आयोगाने आर्थिक वर्ष २०१६-२०१७ ते आर्थिक वर्ष २०१९-२० या तृतीय नियंत्रण कालावधीकरिता, बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५, दि. ०८.१२.२०१५ रोजी पारित केले. सदर विनियमाच्या तरतुद क्र. ५.१ (ब) नुसार, वितरण परवाना धारकाने मध्यावधी फेरविचार आढावा याचिका दि. ३०.११.२०१७ पर्यंत दाखल करणे अपेक्षित होते. तथापि सदर याचिका सादर करण्यास मुदत वाढ देण्यात येऊन दि. २१.१२.२०१७ पर्यंत याचिका सादर करण्याचा आदेश मा. आयोगाने दि. ३०.११.२०१७ रोजी दिला.

त्याप्रमाणे विद्युत अधिनियम २००३ चे कलम ६२ व बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ नुसार खालील बाबींचा समावेश असणारी मध्यावधी आढावा याचिका महावितरण मा. आयोगास सादर करित आहे.

- म.वि.नि.आ. बहुवर्षिय वीजदर विनियम २०११ अंतर्गत वार्षिक लेखांकनावर आधारित आर्थिक वर्ष २०१५-१६ चे अंतिम समायोजन
- म.वि.नि.आ. बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ अंतर्गत वार्षिक लेखांकनावर आधारित आर्थिक वर्ष २०१६-१७ चे अंतिम समायोजन
- म.वि.नि.आ. बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ अंतर्गत उपलब्ध माहितीवर आधारित आर्थिक वर्ष २०१७-१८ चे तात्पुरते समायोजन
- आ. व. २०१८-१९ ते आर्थिक वर्ष २०१९-२० साठी एकूण महसुली गरज, सध्याचे वीजदर व शुल्क यातून अपेक्षित महसुल, महसुलातील अपेक्षित तुटीचा सुधारित अंदाज आणि वर्गवारी निहाय प्रस्तावित वीजदर
- आकार पत्रकाचे (शेडयुल ऑफ चार्जेस) पुनरावलोकन

**ब) आर्थिक वर्ष २०१५-१६ चे अंतिम अचुक समायोजन -**

आर्थिक वर्ष २०१५-१६ च्या वार्षिक लेखापरिक्षित अहवालावर आधारित आ. व. २०१५-१६ ची एकूण महसुली गरज रु. ५९,७२८ कोटी इतकी असून त्याचे सविस्तर विवेचन खालील तक्यात नमुद केले आहे. मा. आयोगाने दि. ०३.११.२०१६ रोजीच्या बहुवर्षीय वीजदर आदेशान्वये मान्यता दिलेल्या एकुण महसुलाच्या गरजेबरोबर प्रत्यक्ष खर्चाची तुलना खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

रु. कोटी मध्ये

| तपशील | आ.व. २०१५-१६ | | तफावत |
|---|---|---|---|
| | बहुवर्षीय वीज दर आदेशानुसार मंजुरीत खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| वीज खरेदी खर्च | ४४,०३४ | ४३,६२६ | (४०८) |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ६,५३३ | ६,८४२ | ३०९ |
| घसारा खर्च | १,८५७ | १,८७६ | १९ |
| कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,७१२ | १,७०० | (१२) |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | २२१ | ६९५ | ४७४ |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ४७० | ४३२ | (३८) |
| अन्य वित्तीय आकार | ३१ | ३६ | ५ |
| बुडीत रक्कमेसाठीची तरतुद | २५८ | ४०५ | १४६ |
| अन्य खर्च | १४ | ३६ | २२ |
| राज्यांतर्गत पारेषण आकार व म.रा. भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ४,०७० | ४,०७० | - |
| ग्राहकांना देण्यात येणारी प्रोत्साहन /सवलत | २५८ | २४९ | (९) |
| पूर्वकालीन खर्च | - | (१७८) | (१७८) |
| मागणी व्यवस्थापनासाठीचा खर्च | ८ | - | (८) |
| भाग भांडवलावरील परतावा | १,५२० | १,६६१ | १४१ |
| आर.एल.सी. (RLC) परतावा | ५ | ५ | (१) |
| ए.एस.सी. (ASC) परतावा | - | १ | १ |
| कार्यक्षमता फायदा / नुकसानीच्या वाटयाचा परिणाम | (२,२८६) | (७१६) | १,५७० |
| पुर्वकालावधीची शिल्लक | (१,०११) | (१,०११) | - |
| **एकूण महसुली गरज** | **५७,६९५** | **५९,७२८** | **२,०३३** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | ५४,९११ | ५०,५१७ | (४,३९४) |
| वीजदरांव्यतिरिक्त उत्पन्न | २,१२३ | २,८८२ | ७५९ |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | ५७६ | ६७८ | १०३ |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | १८९ | २११ | २२ |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | ४ | १ | (३) |
| **एकूण महसुल** | **५७,८०२** | **५४,२९०** | **(३,५१३)** |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **(१०७)** | **५,४३९** | **५,५४६** |

ग्राहक वर्गवारीनिहाय वीजवापरातील बदलांमुळे वीजविक्रीतून मिळणाऱ्या महसुलातील घट, वीज पारेषण खर्चातील कपात आणि संचलन व सुव्यवस्थेवरील खर्चातील बदल ही तफावतीची प्रमुख कारणे आहेत. महावितरण येथे नमुद करु इच्छिते की, ही तफावत महावितरणच्या नियंत्रणाबाहेर आहे. तथापि, समायोजनामध्ये विचारात घेतल्या जाणाऱ्या नियामक तरतूदींच्या अंतर्गत आहे. सदर समायोजनात महावितरणने वितरणहानीतील बदल, संचलन व सुव्यवस्थेवरिल खर्च तसेच खेळत्या भांडवलावरील व्याजातील बदल हयामुळे होणारा कार्यक्षमता फायदा तथा नुकसानीच्या वाटयाचा परिणाम सुद्धा विचारात घेतलेला आहे.

**क) आर्थिक वर्ष २०१६-२०१७ चे अंतिम अचुक समायोजन-**

आर्थिक वर्ष २०१६-१७ च्या वार्षिक लेखापरिक्षित अहवालावर आधारित आ. व. २०१६-१७ ची एकूण महसुली गरज रु. ६२,७७१ कोटी इतकी असून ती खालील तक्यात नमुद केली आहे. मा. आयोगाने दि. ०३.११.२०१६ रोजी च्या बहुवर्षीय वीजदर आदेशान्वये मान्यता दिलेल्या एकुण महसुलाच्या गरजेबरोबर प्रत्यक्ष खर्चाची तुलना खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

**रु. कोटी मध्ये**

| **तपशील** | **आ.व. २०१६-१७** | | **तफावत** |
|---|---|---|---|
| | **बहुवर्षीय वीज दर आदेशानुसार मंजुरीत खर्च** | **प्रत्यक्ष खर्च** | |
| वीज खरेदी खर्च | ४३,७५४ | ४३,८२६ | ७२ |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ५,९१२ | ६,७५३ | ८४१ |
| घसारा खर्च | २,०६२ | २,०४३ | (१९) |
| कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,९३७ | १,६०२ | (३३५) |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १२४ | ७७१ | ६४७ |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ६८८ | ६०३ | (८४) |
| अन्य वित्तीय आकार | - | २९ | २९ |
| बुडीत रक्कमेसाठीची तरतुद | २५८ | ४९२ | २३३ |
| अन्य खर्च | १५ | २१४ | १९९ |
| राज्यांतर्गत पारेषण आकार व म.रा. भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ४,६११ | ३,७९३ | (८१८) |
| ग्राहकांना देण्यात येणारी प्रोत्साहन /सवलत | २७१ | २३५ | (३७) |
| आकस्मिक खर्चासाठीच्या राखीव निधीची तरतूद | १०८ | - | (१०८) |
| मागणी व्यवस्थापनासाठीचा खर्च | २ | १३ | ११ |
| भाग भांडवलावरील परतावा | १,६०२ | १,७६८ | १६७ |
| आर.एल.सी. परतावा | २८४ | १७७ | (१०७) |
| ए.एस.सी. परतावा | - | ५ | ५ |
| कार्यक्षमता फायदा /नुकसानीच्या वाटयाचा परिणाम | (१,०३०) | ४९ | १,०७९ |
| आयोगातर्फे मागील कालावधीचे समायोजन | ३९९ | ३९९ | - |
| **एकुण महसुली गरज** | **६०,९९८** | **६२,७७१** | **१,७७४** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | ५९,२८४ | ५३,९५६ | (५,३२८) |
| वीजदरांव्यतिरिक्त उत्पन्न | ८२६ | ५७४ | (२५२) |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | ५९९ | १,०३४ | ४३५ |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | - | ३८४ | ३८४ |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | ५ | २ | (२) |
| अतिरिक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | २८४ | ११६ | (१६८) |
| **एकूण महसुल** | **६०,९९८** | **५६,०६७** | **(४,९३१)** |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **-** | **६,७०४** | **६,७०४** |

ग्राहक वर्गवारी निहाय वीजवापरातील बदलांमुळे वीज विक्रीतून मिळणाऱ्या महसुलातील घट, वीज पारेषण खर्चातील कपात आणि संचलन व सुव्यवस्थेवरील खर्चातील बदल ही तफावतीची प्रमुख कारणे आहेत. महावितरण येथे नमुद करु इच्छिते की ही तफावत महावितरणच्या नियंत्रणाबाहेर आहे. तथापि, समायोजनामध्ये विचारात घेतल्या जाणाऱ्या नियामक तरतूदींच्या अंतर्गत आहे. सदर समायोजनात महावितरणने वितरण हानीतील बदल, संचलन व सुव्यवस्थेवरिल खर्च तसेच खेळत्या भांडवलावरील व्याजातील बदल हया मुळे होणारा कार्यक्षमता फायदा तथा नुकसानीच्या वाटयाचा परिणाम सुद्धा विचारात घेतलेला आहे.

**ड) आर्थिक वर्ष २०१७-१८ चे तात्पुरते समायोजन-**

आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी ची एकूण महसुली गरज ही सदर वर्षासाठी उपलब्ध असलेल्या तात्पुरत्या माहितीच्या आधारे प्रस्तावित केलेली आहे.

तात्पुरत्या समायोजनाच्या आधारावर आर्थिक वर्ष २०१७-१८ करिता एकूण महसुली गरज रु. ६७,८८२ कोटी इतकी आहे. मा. आयोगाने दि. ०३.११.२०१६ रोजीच्या बहुवर्षीय वीजदर आदेशान्वये मान्य केलेल्या एकुण महसुलाच्या गरजेबरोबर प्रत्यक्ष खर्चाची तुलना खालील तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

**रु. कोटी मध्ये**

| **तपशील** | **आ.व. २०१७-१८** | | **तफावत** |
|---|---|---|---|
| | **बहुवर्षीय वीज दर आदेशानुसार मंजुरीत खर्च** | **अंदाजित खर्च** | |
| वीज खरेदी खर्च | ४७,९५८ | ४९,१३० | १,१७२ |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ६,०८८ | ७,१६२ | १,०७४ |
| घसारा खर्च | २,३०९ | २,७२४ | ४१५ |
| कर्जाऊ भांडवलावरील व्याज | २,२६९ | १,५८६ | (६८३) |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १३७ | १३१ | (६) |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ७२२ | ६६४ | (५८) |
| बुडीत रक्कमेसाठीची तरतुद | २५८ | ४९२ | २३४ |
| अन्य खर्च | १६ | ६५ | ४९ |
| राज्यांतर्गत पारेषण आकार व म.रा. भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ५,८२४ | ४,८१२ | (१,०१२) |
| ग्राहकांना देण्यात येणारी प्रोत्साहन /सवलत | २८५ | २४७ | (३८) |
| आकस्मिक खर्चासाठीच्या राखीव निधीची तरतूद | १२९ | - | (१२९) |
| मागणी व्यवस्थापनासाठीचा खर्च | - | १ | १ |
| भाग भांडवलावरील परतावा | १,६८७ | १,९३८ | २५१ |
| कार्यक्षमता फायदा / नुकसानीच्या वाटयाचा परिणाम | (६३५) | - | ६३५ |
| आयोगातर्फे मागील कालावधीचे समायोजन | (१,११६) | (१,११६) | - |
| अधिक : पुढील वर्षासाठी MPECS ला करावयाच्या प्रदानाचा परिणाम | ४६ | ४६ | - |
| **एकूण महसुली गरज** | **६५,९७७** | **६७,८८२** | **१,९०४** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | ६३,७७५ | ६०,५३९ | (३,२३६) |
| वीजदरांव्यतिरिक्त उत्पन्न | ८६४ | १,०८६ | २२२ |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | ६२३ | ५३६ | (८७) |
| अतिरिक्त वीज विक्रीतून मिळणारा महसुल | - | १८० | १८० |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | ५ | १ | (४) |
| अतिरिक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | ७१० | ११९ | (५९१) |
| **एकूण महसुल** | **६५,९७७** | **६२,४६१** | **(३,५१६)** |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **-** | **५,४२०** | **५,४२०** |

वीज खरेदी खर्चातील वाढ, ग्राहक वर्गवारी निहाय वीजवापरातील बदलांमुळे वीज विक्रीतून मिळणाऱ्या महसुलातील घट, अतिरिक्त अधिभारांतून मिळणाऱ्या उत्पन्नातील घट आणि भांडवली खर्चात झालेला बदल, वीज पारेषण खर्चातील बदल आणि संचलन व सुव्यवस्थेवरील खर्चातील बदल ही तफावतीची प्रमुख कारणे आहेत. महावितरण येथे नमुद करु इच्छिते की, ही तफावत महावितरणच्या नियंत्रणाबाहेर आहे. तथापि, समायोजनामध्ये विचारात घेतल्या जाणाऱ्या नियामक तरतूदींच्या अंतर्गत आहे.

बहुवर्षिय वीजदर अधिनियम २०१५, च्या तरतुदीनुसार कार्यक्षमता फायदा / नुकसानीच्या वाटयाचा परिणाम हा अंतिम अचुक समायोजनांमध्ये विचारात घेणे गरजेचे असल्याने महावितरणने वितरण हानीतील बदलांमुळे कार्यक्षमता फायदा /नुकसानीच्या वाटयाचा परिणाम सध्या विचारात घेतलेला नाही.

**इ) आर्थिक वर्ष २०१८-१९ व आ. व. २०१९-२० ची एकूण महसुली गरज-**

बहुवर्षिय वीजदर अधिनियम २०१५ व काही गृहितकांच्या आधारे आर्थिक वर्ष २०१८-१९ व आर्थिक वर्ष २०१९-२० ची एकूण महसुली गरज प्रस्तावित केलेली आहे.

**१. वीज विक्रीचा अंदाज-**

महावितरणने ऐतिहासिक कल पदधतीचा वापर करुन, ३ वर्षांचा एकत्रित वार्षिक वृद्धीदर लक्षात घेऊन विविध वर्गवारीतील ग्राहकांचा वीजवापर प्रस्तावित केला आहे. जिथे ऐतिहासिक वृद्धीदर अवास्तव / अयोग्य असल्याचे लक्षात आले आहे, तिथे आणखी वास्तववादी अंदाजाच्या नजिक जाण्यासाठी वृद्धी दरामध्ये दुरुस्ती करण्यात आली आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ दरम्यान उच्चदाब औद्योगिक ग्राहकांचा वीजवापर वाढल्याचे निदर्शनास आले आहे. सदर वाढ ही मुख्यत्वे मुक्तप्रवेश ग्राहक परत महावितरणकडे आल्याने झाली आहे (मुक्तप्रवेश वीजवापर हा २०१७-१८ साली कमी झालेला आहे.) त्यामुळे उच्चदाब औद्योगिक ग्राहकांचा वीजवापर अंदाजित करताना मुक्तप्रवेश ग्राहक परत महावितरणकडे आल्याने झालेल्या वाढीचा परिणाम विचारात घेण्यात आलेला नाही.

आर्थिक वर्ष २०१८-१९ व आर्थिक वर्ष २०१९-२० या कालावधीकरिता विविध वर्गवारीचा वृद्धीदर उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे विचारात घेऊन महावितरणने विविध वर्गवारीचा वीजवापर प्रस्तावित केला आहे. भविष्यातील अंदाजित वीजवापराचा आराखडा खालीलप्रमाणे आहे.

**द.ल.यु.**

| ग्राहक वर्गवारी | आ.व. २०१८-१९ (प्रस्तावित) | आ.व. २०१९-२० (प्रस्तावित) |
|---|---|---|
| **उच्चदाब औद्योगिक** | | |
| ११ आणि २२ केव्ही | १२,९९८ | १३,०९७ |
| ३३ केव्ही | ८,६११ | ८,६७३ |
| अतिउच्चदाब | ६,९३७ | ७,३३५ |
| उच्चदाब हंगामी | १०२ | १०२ |
| **एकूण उच्चदाब १ औद्योगिक** | **२८,६४८** | **२९,२०८** |
| **उच्चदाब २ वाणिज्यिक** | | |
| उच्चदाब वाणिज्यिक ११ आणि २२ केव्ही | १,६९१ | १,६६० |
| उच्चदाब वाणिज्यिक ३३ केव्ही | ७६ | ७६ |
| अतिउच्चदाब वाणिज्यिक | ४२ | ४२ |
| **एकूण उच्चदाब २ वाणिज्यिक** | **१,८०९** | **१,७७८** |
| **उच्चदाब ३ रेल्वे** | **५९** | **५९** |
| **उच्चदाब ४ सार्वजनिक पाणी पुरवठा** | **१,५२१** | **१,५२५** |
| **उच्चदाब ५ कृषी** | **७८५** | **८०४** |
| **उच्चदाब ६ एकगठ्ठा पुरवठा (गृहनिर्माण संकुल)** | **२१७** | **२१६** |
| **उच्चदाब ८ तात्पुरता पुरवठा** | **५** | **५** |
| **उच्चदाब ९ सार्वजनिक सेवा** | **९९३** | **१,०१७** |
| **महानिर्मिती सहाय्यकारी पुरवठा** | **२१८** | **२१८** |
| **उच्चदाब कृषी इतर (पोल्ट्री)** | **२२७** | **२५०** |
| **एकूण उच्चदाब** | **३४,४८१** | **३५,०८०** |

लघुदाब वर्गवारीमध्ये महावितरणने वास्तववादी दृष्टीकोनाचा अवलंब करुन दरवर्षी मीटर नसलेल्या १,००,००० कृषी ग्राहकांना मीटर बसवण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सरासरी वीजभार ५ अश्वशक्ती आणि मीटर नसलेल्या कृषी ग्राहकांचा १२४२ युनिट/अ.श/वर्ष इतका निर्देशांक लक्षात घेऊन महावितरणने सदर ग्राहकांचा वीजवापर मीटर नसलेल्या ग्राहकांच्या वर्गवारीतून कमी करुन मीटर असलेल्या ग्राहक वर्गवारीत समाविष्ट केला आहे.

लघुदाब वर्गवारीसाठी भविष्यातील प्रस्तावित वीजविक्रीचा आराखडा खालील तक्त्यात नमुद केला आहे.

**द.ल.यु.**

| ग्राहक वर्गवारी | आ.व. २०१८-१९ (प्रस्तावित) | आ.व. २०१९-२० (प्रस्तावित) |
|---|---|---|
| **लघुदाब वर्गवारी** | | |
| लघुदाब १ (अ)घरगुती बीपीएल | ५४ | ५४ |
| **लघुदाब १ (ब) घरगुती (बीपीएल वगळून)** | **१९,५१०** | **२०,२८२** |
| ०-१०० युनिट | १२,४९८ | १२,८९९ |
| १०१-३०० युनिट | ४,९८५ | ५,१९७ |
| ३०१-५०० युनिट | ८६३ | ९१२ |
| ५०१-१००० युनिट | ५६० | ६०१ |
| १००० युनिट पेक्षा अधिक | ६०३ | ६७३ |

| ग्राहक वर्गवारी | आ.व. २०१८-१९ (प्रस्तावित) | आ.व. २०१९-२० (प्रस्तावित) |
|---|---|---|
| **लघुदाब २ बिगर घरगुती** | | |
| (अ) ० ते २० किलोवॅट | ४,२३५ | ४,६५३ |
| (ब) >२० किलोवॅट ते < =५० किलोवॅट | ८५० | ९२९ |
| (क) ५० किलोवॅट पेक्षा अधिक | ४९३ | ५४० |
| **लघुदाब २ बिगर घरगुती** | **५,५७८** | **६,१२३** |
| लघुदाब ३ सार्वजनिक पाणी पुरवठा | ७४६ | ७८० |
| **लघुदाब ४ कृषीपंप** | **३०,७७८** | **३२,००२** |
| लघुदाब ४ (अ) कृषीपंप मीटर विरहीत | १०,४६९ | ९,८४८ |
| लघुदाब ४ (ब) कृषीपंप मीटर सहित | २०,१७३ | २२,००५ |
| लघुदाब ४ (क) कृषी मीटर सहित (इतर) | १३६ | १५० |
| **लघुदाब ५ (अ) औद्योगिक यंत्रमाग** | **१,९८५** | **२,१३५** |
| (१) ०-२० किलोवॅट | ७१५ | ६९२ |
| (२) २० किलोवॅटपेक्षा अधिक | १,२७० | १,४४३ |
| **लघुदाब ५ (ब) औद्योगिक इतर** | **४,७००** | **४,७८०** |
| (१) ०-२० किलोवॅट | १,४८८ | १,४१० |
| (२) २० किलोवॅटपेक्षा अधिक | ३,२१२ | ३,३७० |
| **लघुदाब ६ पथदिवे** | **१,८८३** | **२,०१४** |
| **लघुदाब ७- तात्पुरता पुरवठा** | **१६** | **१६** |
| **लघुदाब-८ जाहिराती आणि प्रसिध्दी फलक** | **५** | **५** |
| **लघुदाब ९ - स्मशानभुमी व दफनभुमी** | **२** | **२** |
| **लघुदाब-१० (अ) सार्वजनिक सेवा-शासकिय शैक्षणिक संस्था व रुग्णालये** | **५२** | **५८** |
| (i) ० ते २० किलोवॅट | ३५ | ३८ |
| (ii) >२० किलोवॅट ते < =५० किलोवॅट | ९ | १० |
| iii) ५० किलोवॅटपेक्षा अधिक | ८ | ९ |
| **लघुदाब-१० (ब) सार्वजनिक सेवा- इतर** | **४०१** | **४४१** |
| (i) ० ते २० किलोवॅट | २३४ | २५७ |
| (ii) >२० किलोवॅट ते < =५० किलोवॅट | ७८ | ८५ |
| iii) ५० किलोवॅटपेक्षा अधिक | ९० | ९८ |
| **एकूण लघुदाब** | **६५,७१२** | **६८,६९४** |
| **वितरण फ्रँचाईझी वगळून महावितरणची एकूण वीज विक्री** | **१,००,१९३** | **१,०३,७७४** |

महावितरणने खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष १८-१९ व आर्थिक वर्ष १९-२० साठी दोन्ही वितरण फ्रँचाइजीकरीता वीजविक्री प्रस्तावित केलेली आहे.

**द.ल.यु.**

| तपशील | आ.व. २०१८-१९ (प्रस्तावित) | आ.व. २०१९-२० (प्रस्तावित) |
|---|---|---|
| **भिवंडी** | ३,८४६ | ३,९७४ |
| **नागपूर** | १,६४१ | १,७०५ |

महावितरण इथे असे नमुद करते की, मा. आयोगाने ३ नोव्हेबर २०१६ रोजीच्या बहुवर्षिय वीजदर आदेशामध्ये भिवंडी फ्रँचाइजी क्षेत्राची वीजविक्री आ. व १७-१८ ते आ. व. १९-२० साठी स्वतंत्रपणे दर्शविलेली नाही.

## २. वीज खरेदी-

महावितरणने आ. व. १८-१९ व आ. व. १९-२० साठीची वीज खरेदी ही वीजेची उपलब्धता, संचलन मापदंड, आगामी प्रकल्पाचे अपेक्षित कार्यान्वयन इत्यादी बाबींच्या आधारे प्रस्तावित केली आहे. वीजखरेदी खर्च हा मेरीट ऑर्डर डिस्पॅच तत्वावर आधारीत केलेला आहे. आ. व. १८-१९ व आ. व. १९-२० या कालावधीसाठी स्त्रोतनिहाय प्रस्तावित वीज खरेदीचा सारांश खालील प्रमाणे आहे.

| आ.व. २०१८-१९ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **स्त्रोत** | **मा. आयोगाद्वारे मंजुर** | | **महावितरण द्वारे प्रस्तावित** | | **तफावत** | |
| | **वीज खरेदी (द.ल.यु.)** | **वीज खरेदी खर्च (रु. कोटी)** | **वीज खरेदी (द.ल.यु.)** | **वीज खरेदी खर्च (रु. कोटी)** | **वीज खरेदी (द.ल.यु.)** | **वीज खरेदी खर्च (रु. कोटी)** |
| महानिर्मिती | ४५,४७० | १९,२०२ | ४६,९९३ | २०,४७९ | १,५२३ | १,२७७ |
| एनटीपीसी | २५,५८५ | ७,३६५ | २९,८३४ | ९,२४३ | ४,२५० | १,८७९ |
| एनपीसीआयएल | ५,४७१ | १,२८३ | ५,३८० | १,३७८ | (९१) | ९५ |
| एसएसपी | १,२१० | २४८ | १,२१० | २४८ | (०) | (०) |
| पेंच | १३६ | २८ | १३६ | २८ | ० | ० |
| डॉडसन | ११६ | २२ | ११६ | २१ | (०) | (०) |
| जेएसडब्ल्यू | १,९३४ | ४९९ | १,९३४ | ६३१ | ० | १३२ |
| सीजीपीएल (मुंद्रा युएमपीपी) | ५,१५८ | १,२३२ | ५,१५८ | १,३२१ | (०) | ८९ |
| अदानी पॉवर | २०,६०१ | ७,१४६ | २१,११० | ६,५२८ | ५०९ | (६१८) |
| एमको पॉवर | १,३७० | ४६८ | १,४८९ | ५१८ | ११९ | ५० |
| रतन इंडिया | - | ९०४ | - | ९८३ | - | ७९ |
| नुतनशील उर्जा | १७,०६६ | ९,८३० | १५,५८० | ८,३२९ | (१,४८६) | (१,५०१) |
| पीजीसीआयएल शुल्क | - | २,५९२ | - | २,६८८ | - | ९७ |
| **एकूण वीज खरेदी** | **१,२४,११६** | **५०,८१७** | **१,२८,९४०** | **५२,३९४** | **४,८२४** | **१,५७७** |

| आ.व. २०१९-२० | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **स्त्रोत** | **मा. आयोगाद्वारे मंजुर** | | **महावितरण द्वारे प्रस्तावित** | | **तफावत** | |
| | **वीज खरेदी (द.ल.यु.)** | **वीज खरेदी खर्च (रु. कोटी)** | **वीज खरेदी (द.ल.यु.)** | **वीज खरेदी खर्च (रु. कोटी)** | **वीज खरेदी (द.ल.यु.)** | **वीज खरेदी खर्च (रु. कोटी)** |
| महानिर्मिती | ४६,७८७ | १९,७०० | ४५,८८४ | २०,८८८ | (९०३) | १,१८८ |
| एनटीपीसी | २६,८५३ | ७,५९२ | ३१,१२० | ९,९६८ | ४,२६७ | २,३७६ |
| एनपीसीआयएल | ५,४८६ | १,३२१ | ५,४८५ | १,४७४ | (१) | १५३ |
| एसएसपी | १,२१३ | २४९ | १,२१३ | २४९ | ० | ० |
| पेंच | १३७ | २८ | १३७ | २८ | (०) | (०) |
| डॉडसन | ११६ | २२ | ११६ | १६ | ० | (५) |
| जेएसडब्ल्यू | १,९४० | ५०३ | १,९४० | ६३२ | (०) | १२९ |
| सीजीपीएल (मुंद्रा युएमपीपी) | ५,१७२ | १,२४८ | ५,१७२ | १,३२३ | ० | ७५ |
| अदानी पॉवर | २०,६५८ | ७,२२९ | २१,५१२ | ६,६५६ | ८५४ | (५७३) |
| एमको पॉवर | १,३७४ | ४७२ | १,४९३ | ५१६ | ११९ | ४४ |
| रतन इंडिया | - | ९०७ | - | ९८३ | - | ७६ |
| नुतनशील उर्जा | १९,३६५ | ११,२१२ | १७,११२ | ९,०७९ | (२,२५३) | (२,१३४) |
| पीजीसीआयएल शुल्क | - | २,८५१ | - | २,९२८ | - | ७७ |
| **एकूण वीज खरेदी** | **१,२९,१०१** | **५३,३३४** | **१,३१,१८३** | **५४,७४१** | **२,०८२** | **१,४०७** |

### ३. वितरण हानी -

गेल्या काही वर्षात महावितरणने वितरण हानी कमी करण्यात लक्षणीय यश मिळविले आहे. भविष्यातही महावितरण असेच प्रयत्नशील राहील. मा. आयोगाने दि. ३ नोव्हेंबर २०१६ च्या बहुवर्षिय वीजदर आदेशात वितरण हानी (अतिउच्चदाब पातळीवरील ग्राहकांची वीज विक्री वगळून) कमी करण्याचे लक्ष्य ठरवून दिलेले आहे. महावितरणने तेवढीच वितरण हानी प्रस्तावित केली आहे.

| तपशील | आ.व. २०१८-१९ | | आ.व. २०१९-२० | |
|---|---|---|---|---|
| | मंजुर | प्रस्तावित | मंजुर | प्रस्तावित |
| वितरण हानी | १४.७६% | १४.७६% | १३.२६% | १३.२६% |

### ४. वायर व पुरवठा व्यवसायाचे विलगीकरण-

बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५, कलम ६८ अन्वये वितरण परवानाधारकांच्या लेखांकनाचे व एकुण वार्षिक महसुली गरजेचे वायर व पुरवठा या व्यवसायांमध्ये वाटणी सूत्रानुसार विलगीकरण करण्याबाबत प्रावधान करण्यात आलेले आहे. महावितरणने विनियमांतील तरतुदींनुसार विविध घटकांचे वायर व पुरवठा असे विलगीकरण केलेले आहे.

### ५. आ. व. १८-१९ व आ. व. १९-२० या कालावधी साठी वार्षिक महसुली गरज-

आ. व. १८-१९ व आ. व. १९-२० या कालावधी साठी एकूण वार्षिक महसुली गरज ही विविध घटकांच्या अंदाजानुसार व बहुवर्षिय वीजदर विनियम २०१५ च्या तरतुदी नुसार प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच मंजूर वीज दरानुसार तृतीय नियंत्रण कालावधीकरीता वीज विक्री केल्यास मिळणारा महसुल व निर्माण होणारी महसुली तुट प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

रु. कोटी मध्ये

| तपशील | आ.व. २०१८-१९ | | तफावत | आ.व. २०१९-२० | | तफावत |
|---|---|---|---|---|---|---|
| | मंजुर | प्रस्तावित | | मंजुर | प्रस्तावित | |
| वीज खरेदी खर्च | ५०,८१७ | ५२,३९४ | १,५७७ | ५३,३३४ | ५४,७४१ | १,४०७ |
| संचलन व सुव्यवस्थेवरील खर्च | ६,२६८ | ७,५९६ | १,३२८ | ६,४५४ | ८,०५६ | १,६०२ |
| घसारा खर्च | २,४५० | ३,०११ | ५६१ | २,४९८ | ३,२३५ | ७३७ |
| कर्जाऊ भांडवलावरील व्याज | २,३४१ | १,५३६ | (८०५) | २,१७६ | १,३११ | (८६५) |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | १४४ | १३५ | (८) | १४३ | १३४ | (८) |
| ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ७५८ | ६३४ | (१२४) | ७९६ | ६९७ | (९८) |
| बुडीत रक्कमेसाठीची तरतुद | २५८ | २६ | (२३२) | २५८ | - | (२५८) |
| अन्य खर्च | १६ | ६८ | ५२ | १७ | ७१ | ५४ |
| राज्यांतर्गत पारेषण आकार व म.रा. भार प्रेषण केंद्राचे शुल्क तथा आकार | ६,५३९ | ५,४१८ | (१,१२१) | ६,६१९ | ५,४९९ | (१,१२०) |
| ग्राहकांना देण्यात येणारी प्रोत्साहन /सवलत | २९९ | २५९ | (४०) | ३१४ | २७२ | (४२) |
| आकस्मिक खर्चासाठीच्या राखीव निधीची तरतूद | १४३ | - | (१४३) | १४९ | - | (१४९) |
| मागणी व्यवस्थापनासाठीचा खर्च | - | ०.४ | ०.४ | - | - | - |
| भाग भांडवलावरील परतावा | १,७१६ | २,१०२ | ३८६ | १,७१९ | २,२५५ | ५३६ |
| कार्यक्षमता फायदा / नुकसानीच्या वाटयाचा परिणाम | (३११) | - | ३११ | - | - | - |
| मा. आयोगाने पुर्वकालावधीसाठी केलेले समायोजन | (१,०३२) | (१,०३२) | - | ८५३ | ८५३ | - |
| अधिक : पुढील वर्षांसाठी MPECS ला करावयाच्या प्रदानाचा परिणाम | ४३ | ४३ | - | ४० | ४० | - |
| **एकूण महसुली गरज** | **७०,४४९** | **७२,१९०** | **१,७४२** | **७५,३६९** | **७७,१६६** | **१,७९७** |
| वीज विक्रीतून मिळणारा एकुण महसुल | ६८,१५५ | ६५,३८४ | (२,७७१) | ७२,९७७ | ६८,५६५ | (४,४१२) |
| वीजदरांव्यतिरिक्त उत्पन्न | ९०३ | १,०५१ | १४८ | ९४५ | १,१०४ | (१५९) |
| ओपन ॲक्सेस चार्जेस पासुनचे उत्पन्न | ६४८ | ६४१ | (७) | ६७४ | ६७५ | १ |
| वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | ५ | २ | (३) | ५ | २ | (३) |
| अतिरिक्त अधिभारातून मिळणारे उत्पन्न | ७३८ | १२२ | (६१६) | ७६८ | १२६ | (६४२) |
| **एकूण महसुल** | **७०,४४९** | **६७,२००** | **(३,२४९)** | **७५,३६९** | **७०,४७१** | **(४,८९९)** |
| **महसुलातील तुट / (आधिक्य)** | **-** | **४,९९०** | **४,९९०** | **-** | **६,६९५** | **६,६९५** |

वीज खरेदी खर्चातील वाढ, ग्राहक वर्गवारीनिहाय वीज वापरातील बदलांमुळे वीज विक्रीतून मिळणाऱ्या महसुलातील घट, मा.आयोगाने मंजुर केलेल्या पारेषण आकारातील बदल, अतिरिक्त अधिभारांतुन मिळणाऱ्या उत्पन्नातील घट आणि भांडवली खर्चात झालेला बदल ही तफावतीची प्रमुख कारणे आहेत.

बहुवर्षिय वीजदर अधिनियम २०१५, च्या तरतुदीनुसार कार्यक्षमता फायदा / नुकसानीच्या वाटयाचा परिणाम हा अंतिम अचुक समायोजनांमध्ये विचारात घेणे गरजेचे असल्याने महावितरणने वितरण हानीतील बदलांमुळे कार्यक्षमता फयदा तथा नुकसानीच्या वाट्याचा परिणाम विचारात घेतलेला नाही.

**फ) एकूण महसुली तुट-**

आ. व. १५-१६ ते आ. व. १७-१८ ची महसुली तुट, पुर्नविचार याचिकेवरील आदेशाचा परिणाम (प्र.क्र. १७६/२०१६), आ. व. १४-१५ मधील वाढीव वितरणहानी मुळे कार्यक्षमता नुकसानीच्या वितरणात फरक, कॅरिंग कॉस्ट, आर्थिक वर्ष २०१६ करिता नुतनशील उर्जा खरेदीच्या बंधनासाठी दंडाचा परतावा, आ. व. १८-१९ ते आर्थिक वर्ष १९-२०साठी अंदाजित महसुली तूट इत्यादी बाबींच्या परिणाम स्वरुप एकूण महसुली तुट रु. ३४,६४६ कोटी इतकी असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| **तपशिल** | **रक्कम (रु. कोटी मध्ये)** |
|---|---:|
| आर्थिक वर्ष २०१५-१६ करिताची अंतीम समायोजना पोटी आलेली महसुली तुट | ५,५४६ |
| आर्थिक वर्ष २०१६-१७ करिताची अंतीम समायोजना पोटी आलेली महसुली तुट | ६,७०४ |
| आर्थिक वर्ष २०१७-१८ करिताची महसुली तुट | ५,४२० |
| आर्थिक वर्ष २०१८-१९ करिताची महसुली तुट | ४,९९० |
| आर्थिक वर्ष २०१९-२० करिताची महसुली तुट | ६,६९५ |
| आर्थिक वर्ष २०१४-१५ साठी पुनरावलोकन आदेशाचा प्रभाव (प्रकरण क्र. १७६/२०१६) | २१६ |
| आर्थिक वर्ष १४-१५ मधील वाढीव वितरण हानीमुळे कार्यक्षमता हानीच्या वितरणातील प्ररक | ९३५ |
| मागील वर्षाची आर्थिक वर्ष २०१७-१८ पर्यंत महसूली तूटी वरील कॅरिंग कॉस्ट | **३,८८०** |
| नुतनशील उर्जा खरेदीच्या बंधनासंबंधित बहुवर्षिय वीज दर आदेशात लावलेल्या दंडाचा परतावा | **२६०** |
| **एकूण** | **३४,६४६** |

**ग) वीजदर संरचना-**

महावितरण येथे असे नमूद करु इच्छिते की, कंपनीचे कार्य सुरळीत राहण्याकरीता ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवेचा संपूर्ण खर्च वेळेत वसुल होणे गरजेचे आहे. विद्युत अधिनियम २००३, बहुवर्षिय वीजदर विनीयम व राष्ट्रीय वीजदर धोरणाप्रमाणे मा. आयोग ग्राहकांचे वीजदर ठरवित असते. मा. आयोगाने कार्यक्षमता, अर्थव्यवस्था, प्रभावी कार्यपद्धती तसेच वीज ग्राहकांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांचा दर्जा वाढावा याकरीता सतत प्रोत्साहन दिलेले आहे. महावितरणची आर्थिक परिस्थिती सुस्थितीत राहण्यासाठी याच तत्वाचा पुढेही अवलंब करण्यात यावा, अशी विनंती महावितरण मा. आयोगास करत आहे.

महावितरणने प्रस्तावित केलेली वीजदर संरचना ही पुढील तत्वांवर आधारीत आहे.

- स्थिर आकाराव्दारे स्थिर खर्चाची परिपूर्तता करण्यासाठी स्थिर आकाराचे सुसूत्रीकरण.
- उच्चदाब वर्गवारीतील ग्राहकांसाठी केव्हीएएच आधारीत बिलींग.
- प्रोत्साहनांमध्ये सुसूत्रता आणणे.
- ठराविक वर्गवारीतील नविन तसेच सद्यस्थितीतील ग्राहकांना प्रोत्साहन देणे.
- वास्तविक मागणी व पुरवठा लक्षात घेऊन टी.ओ.डी. (ToD) दरांचे पुनरावलोकन
- राष्ट्रीय वीजदर धोरणाच्या सुत्रानुसार क्रॉस सबसिडी अधिभार वसूल करणे.
- स्ववापरासाठी वीजउत्पादन करणा-या उत्पादकांकडून वीज घेणा-या ग्राहकांसह सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी अतिरिक्त अधिभार लागु करणे.
- वीजेवर चालणा-या वाहनांसाठीच्या प्रभारण केंद्रांसाठी (Charging Stations) स्वतंत्र वर्गवारी.
- वीजदरामध्ये स्थैर्य आणण्यासाठी आ. व १८-१९ व आ. व. १९-२० साठी समान वीजदर.

**ह) वीजदर वाढीची कारणे-**

महावितरणची महसुली तुट भरुन काढण्याकरीता महावितरण विविध वर्गवारीच्या स्थिर आकार व वीज आकारामध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित करीत आहे. सदर दरवाढ ही देश पातळीवर असणाऱ्या महागाई निर्देशांक तसेच वीज खरेदी खर्चातील वाढ, महसुलातील घट, म.वि.नि.आ. (नुतनशील उर्जाखरेदीचे बंधन, त्याचे पालन व नुतनशील उर्जाप्रमाणपत्र चौकटीचे कार्यान्वयन) विनियम, २०१६ नुसार नुतनशील वीज खरेदीचे बंधन (RPO), ग्राहक वर्गवारीनिहाय वीज वापरातील बदलामुळे महसुलावरील परिणाम, आंतरराज्य पारेषण खर्चातील (POC) वाढ, इ. कारणामुळे वाढीव खर्चाला अनुसरुन करण्यात आलेली आहे. सदर दरवाढ ही महागाई दरावर मात करण्याकरीता व उपरोक्त नमुद विविध घटकांमुळे निर्माण होणारे वाढीव खर्च, जे महावितरणच्या नियंत्रणा बाहेर आहेत, ते भरुन काढण्याकरीता आवश्यक आहे.

**ई) वहन आकार-**

मा. आयोगाने बहुवर्षिय वीजदर अधिनियम, २०१५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वितरण प्रणाली व पुरवठा खर्च विलगीकरण गुणोत्तराचा विचार करता, तसेच मा. आयोगाने पुर्वीच्या आदेशांमध्ये अवलंब केलेली पदधत विचारात घेऊन महावितरणने आ. व. १८-१९ व आ. व. १९-२० साठी उच्चदाब व लघुदाब वर्गवारीसाठी प्रस्तावित वहन हानी व वहन आकाराचा सारांश खालील तक्त्यामध्ये दर्शविला आहे.

| **तपशिल** | **आ.व. २०१८-१९** | | **आ.व. २०१९-२०** | |
|---|---|---|---|---|
| | **वहन हानी (%)** | **वहन आकार * रु./युनिट** | **वहन हानी (%)** | **वहन आकार * रु./युनिट** |
| **३३ केव्ही पातळी** | ६% | ०.१५ | ६% | ०.१५ |
| **२२/११ केव्ही पातळी** | ९% | ०.८३ | ९% | ०.७८ |
| **लघुदाब पातळी** | १२% | १.२६ | १२% | १.२४ |

*रु./केव्हीएएच किंवा रु./केडब्ल्युएच

**ज) क्रॉस सबसिडी अधिभार-**

क्रॉस सबसिडी अधिभार हा वीजवितरण परवानाधारकांसाठी भरपाई शुल्क आहे. मा. अपिलीय प्राधिकरण नवी दिल्ली यांनी नमुद केल्याप्रमाणे, क्रॉस सबसिडी अधिभार हा केवळ वितरण परवानाधारकांच्या क्रॉस सबसिडीच्या नुकसानभरपाईसाठी नसुन ज्यांनी मुक्तप्रवेश घेतला नाही अशा सामान्य ग्राहकांच्या नुकसान भरपाईसाठीसुद्धा आहे. म्हणुन क्रॉस सबसिडी अधिभार हा सद्यस्थितीच्या क्रॉस सबसिडीवर आधारित असणे आवश्यक आहे.

केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने ऊर्जा मंत्रालयाच्या सल्ल्यानुसार वीज नियम २००५ मधील स्ववापरासाठी वीज निर्मिती प्रल्कपांशी संबंधित तसेच मुक्त प्रवेश संबंधी मुद्याचे परिक्षण करण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. २४ ऑगस्ट २०१७ रोजी जारी केलेल्या ऊर्जा मंत्रालयाच्या समितीच्या अहवालावर आधारित सल्लापुर्ती पेपर मध्ये असे प्रस्तावित केले आहे की, राज्य विद्युत आयोगांना वीजदर धोरण २०१६ च्या परिच्छेद ८.३-२ आणि परिच्छेद ८.४-१ मध्ये नमुद केलेल्या दोन्ही तरतुदी एकाचवेळी अंमलात आणणे आवश्यक आहे. जर काही कारणांमुळे एखादी तरतुद लागू करणे शक्य नसेल तर दुसरी तरतुद देखील लागू करण्यात येऊ नये.

त्यानुसार महावितरणने सुधारित राष्ट्रीय वीजदर धोरणामध्ये नमूद केलेल्या सुत्रानुसार परंतु कुठलीही मर्यादा न लावता क्रॉस सबसिडी अधिभाराची गणना केली आहे. उदाहरणादाखल औद्योगिक ग्राहकांसाठी गणना केलेला क्रॉस सबसिडी अधिभार खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

**रु/केव्हीएएच**

| **ग्राहक वर्गवारी** | **आ.व. २०१८-१९** | **आ.व. २०१९-२०** |
|---|---|---|
| उच्चदाब १ (अ):उच्चदाब औद्योगिक | | |
| ११/२२ केव्ही | ४.५० | ४.४० |
| ३३ केव्ही | ३.५३ | ३.३८ |
| अतिउच्चदाब | ४.६२ | ४.४० |

**क) अतिरिक्त अधिभार-**

मा. आयोगाच्या मान्यतेनुसार राज्यातील वीज मागणीतील एकूण वाढ विचारात घेऊन महावितरणने वीजखरेदीकरीता करार केले आहेत. मात्र बरेचसे उच्चदाब वीज ग्राहक महावितरण कडून वीज खरेदी न करता मुक्त प्रवेश (Open Access) माध्यमाद्वारे वीजखरेदी करत आहेत. परिणामी बरीचशी उर्जानिर्मिती क्षमता विनावापर राहात आहे.

अशा परिस्थितीत, मागणी आणि पुरवठा यांचा ताळमेळ घालण्यासाठी ब-याचशा निर्मिती केंद्रांना कमी क्षमतेवर चालवून देखील पुर्ण स्थिर आकार दयावा लागत आहे. त्यामुळे, वीज न वापरताही द्याव्या लागणा-या स्थिर आकाराच्या वसुलीसाठी मुक्त प्रवेश माध्यमातून वीज खरेदी करणाऱ्या ग्राहकांना अतिरिक्त अधिभार लावण्याचे तत्व कायदयाच्या तसेच विनियमाच्या तरतुदीनुसार मा. आयोगाने बहुवर्षिय वीज दर याचिकेतील आदेशान्वये अंगिकारले आहे.

दि. ३ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या बहुवर्षिय वीजदर आदेशामध्ये मा. आयोगाने अवलंबिलेल्या कार्यपध्दतीनुसार महावितरणने अतिरिक्त अधिभाराची गणना केलेली आहे. आ. व. २०१८-१९ करिता अतिरिक्त अधिभार हा रु. १.२५ प्रति केव्हीएएच आणि आ. व. २०१९-२० करीता रु. १.२८ प्रति केव्हीएएच इतका प्रस्तावित करण्यात आला आहे.

महावितरण असे नमुद करु इच्छिते की, विद्युत नियम २००५ च्या तरतुदींचा गैरवापर करुन क्रॉस सबसिडी सरचार्ज आणि अतिरिक्त अधिभार टाळण्यासाठी काही मुक्त प्रवेश ग्राहकांकडून कॅप्टीव पॉवर प्लॅंट दर्शविण्याचे प्रकार वाढत आहेत. याकरीता कायदेशीर उपाय योजना करणे गरजेचे आहे. असे क्रॉस सबसिडी सरचार्ज व अतिरिक्त अधिभार चुकविल्यामुळे महावितरणच्या महसुलावर विपरित परिणाम होत आहे व त्यामुळे होणारी महसूलातील तुट सामान्य ग्राहकांवर विनाकारण लादली जात आहे. परिणामी, सामान्य ग्राहकांची कोणतीही चूक नसताना त्यांचे वीजदर वाढत आहेत. त्यामुळे महावितरणची मा. आयोगाला अशी विनंती आहे की, अतिरिक्त अधिभार सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांसह कॅप्टीव पॉवर प्लांटकडून वीज घेणा-या मुक्त प्रवेश ग्राहकांना देखील लावण्यात यावा.

**ल) व्होल्टेज निहाय वीज पुरवठा खर्च-**

प्रत्यक्ष विद्युत दाबानुसार पुरवठा खर्चाची माहिती उपलब्ध नसल्यामुळे मा. विद्युत अपिलीय प्राधिकरणाच्या आदेशातील तर्कानुसार व्होल्टेज निहाय वीज पुरवठा खर्चाची परिगणना करण्यात आली आहे. मा. विद्युत अपिलीय प्राधिकरणाच्या आदेशास अधीन राहून केलेल्या काही गृहितकांनुसार एम्बेडेड कॉस्ट ॲप्रोचवर आधारित आ. व. २०१८-१९ आणि २०१९-२० करीता व्होल्टेजनिहाय विद्युत पुरवठा खर्च खालील तक्त्यात दर्शविला आहे.

**रु./युनिट**

| **व्होल्टेज पातळी** | **आ. व. २०१८-१९** | **आ. व. २०१९-२०** |
|---|---|---|
| अतिउच्चदाब (६६ केव्ही आणि अधिक) | ५.५२ | ५.६५ |
| उच्चदाब (३३ केव्ही) | ६.५३ | ६.८२ |
| उच्चदाब (२२ किंवा ११ केव्ही) | ६.५७ | ६.८९ |
| लघुदाब | ६.९१ | ७.१० |
| **एकूण** | **६.७१** | **६.९३** |

**म) वीजदराची व्यवहार्यता (ॲप्लीकॅबीलीटी)**

प्रत्येक ग्राहकांची वीजदरांची व्यवहार्यता (Tariff Applicability) ही ग्राहकांचां वीजवापराचा प्रकार, वीजवापराचा हेतु, ग्राहक वर्गवारी इ. बाबींवर अवलंबुन असते.

मा. आयोगाने याप्रमाणे ग्राहकांची वर्गवारी केलेली आहे. तरीसुध्दा ग्राहकांचे विशिष्ट वर्गवारीमध्ये वर्गीकरण केल्याने न्यायालयीन दावे दाखल करण्यात वाढ झाल्याचे दिसून येते. त्यामुळे महावितरणने सदर विषयाचा सखोल अभ्यास करुन तसेच क्षेत्रीय अधिका-यांशी विचारविनिमय करुन शक्य तितक्या प्रमाणात सर्व समावेशक वीजदर व्यवहार्यता प्रस्तावित करण्याचा प्रयत्न केला आहे.

त्याप्रमाणे महावितरणने प्रस्तावित वीज दर व्यवहार्यता सादर केलेली आहे.

**न) वीजदर पत्रक-**

वर्गवारी / प्रवर्गनिहाय प्रचलित व प्रस्तावित विद्युत आकारांचा (वहन आकाराशिवाय) तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

**विद्युत आकार**

| **वर्गवारी** | **आ.व.१७-१८** | **आ.व.१८-१९** | | | **आ.व.१९-२०** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **विद्यमान दर** | **मंजुर दर** | **प्रस्तावित दर** | **मंजुर दराच्या तुलनेत %बदल** | **मंजुर दर** | **प्रस्तावित दर** | **आ. व. १८-१९ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत %बदल** |
| | **रु./के.डब्ल्यु.एच.** | **रु./के.डब्ल्यु.एच.** | **रु/ के.व्ही.ए.एच.** | | **रु./के.डब्ल्यु.एच.** | **रु/ केव्हीएएच** | |
| **उच्चदाब १(अ)(i) औद्योगिक** | ७.०७ | ६.९८ | ७.०९ | २% | ६.९३ | ७.०९ | ० |
| **उच्चदाब १(अ) (ii) औद्योगिक नवीन जोडण्या** | | | ६.०९ | | | ६.०९ | ० |
| **उच्चदाब १(ब) (i) उच्च दाब औद्योगिक हंगामी** | ७.६७ | ७.३७ | ७.७० | ४% | ७.२० | ७.७० | ० |
| **उच्चदाब १(ब) (ii) उच्च दाब औद्योगिक हंगामी नवीन जोडण्या** | | | ६.७० | | | ६.७० | ० |
| **उच्चदाब २ (अ) वाणिज्यिक** | ११.४० | ११.४५ | ११.५६ | १% | ११.५० | ११.५६ | ० |
| **उच्चदाब २ (ब) वाणिज्यिक नवीन जोडण्या** | | | १०.५६ | | | १०.५६ | ० |
| **उच्चदाब ३ (अ) रेल्वे /मेट्रो/मोनोरेल्वे** | ६.०१ | ५.८० | ५.९१ | २% | ५.५५ | ५.९१ | ० |
| **उच्चदाब ३ (ब) रेल्वे /मेट्रो/मोनोरेल्वे नवीन जोडण्या** | | | ४.९१ | | | ४.९१ | ० |
| **उच्चदाब ४ सार्वजनिक पाणी पुरवठा** | ५.७५ | ५.८५ | ६.०२ | ३% | ५.९५ | ६.०२ | ० |
| **उच्चदाब ५ (अ) कृषीपंप** | ३.३० | ३.४४ | ४.२४ | २३% | ३.६५ | ४.२४ | ० |
| **उच्चदाब ५ (ब) कृषी इतर** | ४.५६ | ४.७५ | ५.९१ | २४% | ५.०२ | ५.९१ | ० |

| वर्गवारी | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत %बदल |
| | रु./के.डब्ल्यु.एच. | रु./के.डब्ल्यु.एच. | रु/ के.व्ही.ए.एच. | | रु./के.डब्ल्यु.एच. | रु/ केव्हीएएच | |
| उच्चदाब ६ एकगठ्ठा गृहसंकुल पुरवठा (रहिवासी) | ५.८२ | ५.८२ | ५.९३ | २% | ५.८६ | ५.९३ | ० |
| उच्चदाब ८(अ) तात्पुरता पुरवठा (धार्मिक प्रयोजन) | ३.१० | ३.२० | ३.६३ | १३% | ३.२७ | ३.६३ | ० |
| उच्चदाब ८(ब) तात्पुरता पुरवठा (अन्य प्रयोजन) | १०.१४ | १०.२७ | ११.६१ | १३% | १०.३९ | ११.६१ | ० |
| उच्चदाब ९ (अ) सार्वजनिक सेवा (शासकीय) | ७.२० | ७.२० | ७.७४ | ८% | ७.१० | ७.७४ | ० |
| उच्चदाब ९ (ब) सार्वजनिक सेवा(इतर) | ९.१० | ९.०७ | ९.७२ | ७ % | ८.९३ | ९.७२ | ० |
| उच्चदाब १० वीजेवर चालणाऱ्या वाहनांकरिता चार्जींग स्टेशन/सेंटर्स | | | ६.०० | | | ६.०० | ० |

टिप: उपरोक्त विदयुत आकाराशिवाय ११/२२ केव्ही, ३३ केव्ही या व्होल्टेज पातळीनुसार वहन आकार अतिरीक्त आहेत.

रु./के.डब्ल्यु.एच.

| वर्गवारी | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत %बदल |
| **लघुदाब १- लघुदाब घरगुती** | | | | | | | |
| **लघुदाब १ (अ)घरगुती बीपीएल** | १.०५ | १.०६ | १.०७ | १% | १.०८ | १.०७ | ० |
| **लघुदाब १ (ब) घरगुती** | | | | | | | |
| ०-१०० युनिट | ३.०० | ३.०७ | ३.०७ | ०% | ३.१८ | ३.०७ | ० |
| १०१-३०० युनिट | ६.७३ | ६.८१ | ७.१९ | ६% | ६.९१ | ७.१९ | ० |
| ३०१-५०० युनिट | ९.७० | ९.७६ | १०.२६ | ५% | ९.८६ | १०.२६ | ० |
| ५०१-१००० युनिट | ११.२० | ११.२५ | ११.८१ | ५% | ११.३७ | ११.८१ | ० |
| १००० युनिट पेक्षा अधिक | १२.४८ | १२.५३ | १३.१४ | ५% | १२.६५ | १३.१४ | ० |
| **लघुदाब २ बिगर घरगुती** | | | | | | | |
| (अ) ० -२० किलोवॅट (०-२०० युनिट) | ६.०९ | ६.१० | ७.९६ | ३% | ६.१५ | ७.९६ | ० |
| ० -२० किलोवॅट (२०० युनिटपेक्षा अधिक) | ९.३२ | ९.३२ | | | ९.३७ | | |
| (ब) >२० किलोवॅट ते <= ५० किलोवॅट | ९.९८ | ९.९८ | ११.५९ | १६% | ९.९८ | ११.५९ | ० |
| (क) ५० किलोवॅट पेक्षा अधिक | १२.५५ | १२.५८ | १४.१९ | १३% | १२.६३ | १४.१९ | ० |
| **लघुदाब ३ सार्वजनिक पाणी पुरवठा** | | | | | | | |
| (अ) ० -२० किलोवॅट | १.९७ | २.०९ | २.६२ | २५% | २.३१ | २.६२ | ० |
| (ब) >२० किलोवॅट ते <= ४० किलोवॅट | ३.२४ | ३.३७ | ४.१५ | २३% | ३.५४ | ४.१५ | ० |
| (क) ४० किलोवॅट पेक्षा अधिक | ४.५३ | ४.६९ | ५.७४ | २२% | ४.८१ | ५.७४ | ० |

| वर्गवारी | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत %बदल |
| **लघुदाब ४ कृषीपंप** | | | | | | | |
| **लघुदाब ४ (अ) कृषीपंप मीटर विरहीत ** | | | | | | | |
| **वर्गवारी १ (वार्षिक १३१८ तास/अ.श./प्रति वर्ष पेक्षा जास्त वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे)** | | | | | | | |
| ० - ५ अ.श | ३०९ | ३३४ | ४४९ | ३४% | ३६३ | ४४९ | ० |
| >५ अ.श ते <=७.५ अ.श | ३४१ | ३६५ | ४९० | ३४% | ३९८ | ४९० | ० |
| ७.५ अ.श पेक्षा जास्त | ३८१ | ४०० | ५३७ | ३४% | ४४३ | ५३७ | ० |
| **वर्गवारी २ (वार्षिक १३१८ तास/अ.श./प्रति वर्ष पेक्षा कमी वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे)** | | | | | | | |
| ० - ५ अ.श | २१२ | २३६ | ३२० | ३६% | २५१ | ३२० | ० |
| >५ अ.श ते <=७.५ अ.श | २४७ | २६६ | ३६२ | ३६% | २९३ | ३६२ | ० |
| ७.५ अ.श पेक्षा जास्त | २७५ | २९४ | ३९८ | ३५% | ३२१ | ३९८ | ० |
| लघुदाब ४ (ब) कृषी मीटर सहित कृषीपंप | १.८३ | १.९५ | २.५५ | ३१% | २.१४ | २.५५ | ० |
| लघुदाब ४ (क) कृषी मीटर सहित इतर | ३.०९ | ३.२६ | ४.३५ | ३३% | ३.५१ | ४.३५ | ० |
| **लघुदाब ५ (अ) औद्योगिक यंत्रमाग** | | | | | | | |
| (१) ०-२० किलोवॅट | ४.५४ | ४.५९ | ४.७० | २% | ४.६९ | ४.७० | ० |
| (२) २० किलोवॅटपेक्षा अधिक | ५.९१ | ५.९५ | ६.०६ | २% | ६.०२ | ६.०६ | ० |
| **लघुदाब ५ (ब) औद्योगिक इतर** | | | | | | | |
| (१) ०-२० किलोवॅट | ४.७४ | ४.७६ | ४.८७ | २% | ४.८१ | ४.८७ | ० |
| (२) २० किलोवॅटपेक्षा अधिक | ६.३९ | ६.३८ | ६.४९ | २% | ६.४२ | ६.४९ | ० |
| **लघुदाब ६ पथदिवे** | | | | | | | |
| (अ) ग्रामपंचायत, अ,ब आणि क श्रेणीच्या नगरपालिका | ४.२९ | ४.३९ | ५.१६ | १८% | ४.४९ | ५.१६ | ० |
| (ब) महानगरपालिका | ५.३९ | ५.४८ | ६.४१ | १७% | ५.५८ | ६.४१ | ० |
| **लघुदाब ७- तात्पुरता पुरवठा** | | | | | | | |
| (अ) तात्पुरत्या जोडण्या (धार्मिक प्रयोजन) | ३.१० | ३.२० | ३.७९ | १८% | ३.२७ | ३.७९ | ० |
| (ब) तात्पुरत्या जोडण्या (अन्य प्रयोजन) | १२.४७ | १२.६३ | १४.६४ | १६% | १२.७९ | १४.६४ | ० |
| **लघुदाब-८ जाहिराती आणि प्रसिध्दी फलक** | १२.४२ | १२.५८ | १२.५८ | ०% | १२.७४ | १२.५८ | ० |
| **लघुदाब ९ - स्मशानभुमी व दफनभुमी** | ३.०७ | ३.१४ | ३.७८ | २१% | ३.२६ | ३.७८ | ० |
| **लघुदाब-१० (अ) सार्वजनिक सेवा-शासकिय शैक्षणिक संस्था व रुग्णालये** | | | | | | | |
| (i) ० ते २० किलोवॅट (०-२०० युनिट) | ३.१७ | ३.१५ | ४.४८ | २०% | ३.१२ | ४.४८ | ० |

| वर्गवारी | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यमान दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत %बदल |
| ० ते २० किलोवॅट (२००युनिट पेक्षा अधिक) | ४.३९ | ४.३२ | | | ४.२६ | | |
| (ii) >२० किलोवॅट ते <=५० किलोवॅट | ५.३१ | ५.१० | ५.९२ | १६% | ५.०३ | ५.९२ | ० |
| iii) ५० किलोवॅट पेक्षा अधिक | ५.९६ | ५.८१ | ६.५० | १२% | ५.७४ | ६.५० | ० |
| **लघुदाब-१० (ब) सार्वजनिक सेवा- इतर** | | | | | | | |
| (i) ० ते २० किलोवॅट (०-२०० युनिट) | ४.३१ | ४.२४ | ५.९१ | ७% | ४.१९ | ५.९१ | ० |
| ० ते २० किलोवॅट (२००युनिट पेक्षा अधिक) | ६.८४ | ६.७९ | | | ६.७४ | | |
| (ii) >२० किलोवॅट ते <=५० किलोवॅट | ६.९० | ६.८५ | ८.०६ | १८% | ६.७५ | ८.०६ | ० |
| iii) ५० किलोवॅट पेक्षा अधिक | ७.२६ | ७.२१ | ८.४२ | १७% | ७.११ | ८.४२ | ० |
| **लघुदाब ११ वीजेवर चालणाऱ्या वाहनांकरिता चार्जींग स्टेशन/सेंटर्स** | | | ६.०० | | | ६.०० | ० |

*रु./अ.श./महिना

टिप: उपरोक्त विदयुत आकाराशिवाय ११/२२ केव्ही, ३३ केव्ही या व्होल्टेज पातळीनुसार वहन आकार अतिरीक्त आहेत.

तपशीलवार वर्गवारी/ उपवर्गवारी निहाय सध्याचे आणि प्रस्तावित **स्थिर/मागणी आकार** खालील तक्त्यात नमूद केले आहे.

| वर्गवारी | एकक | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सद्याचे दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत %बदल |
| | | मागणी दर | | | | मागणी दर | | |
| **उच्चदाब १(अ)(i) औद्योगिक** | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५६५ | १०९% | २९० | ५६५ | ० |
| **उच्चदाब १(अ) (ii) औद्योगिक नवीन जोडण्या** | रु./केव्हीए/महिना | | | ५६५ | | | ५६५ | ० |
| **उच्चदाब १(ब) (i) उच्च दाब औद्योगिक हंगामी** | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५६५ | १०९% | २९० | ५६५ | ० |
| **उच्चदाब १(ब) (ii) उच्च दाब औद्योगिक हंगामी नवीन जोडण्या** | रु./केव्हीए/महिना | | | ५६५ | | | ५६५ | |
| **उच्चदाब २ (अ) वाणिज्यिक** | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५६५ | १०९% | २९० | ५६५ | ० |
| **उच्चदाब २ (ब) वाणिज्यिक नवीन जोडण्या** | रु./केव्हीए/महिना | | | ५६५ | | | ५६५ | ० |
| **उच्चदाब ३ (अ) रेल्वे /मेट्रो/मोनोरेल्वे** | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५६५ | १०९% | २९० | ५६५ | ० |
| **उच्चदाब ३ (ब) रेल्वे /मेट्रो/मोनोरेल्वे नवीन जोडण्या** | रु./केव्हीए/महिना | | | ५६५ | | | ५६५ | ० |
| **उच्चदाब ४ सार्वजनिक पाणी पुरवठा** | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५६५ | १०९% | २९० | ५६५ | ० |
| **उच्चदाब ५ (अ) कृषीपंप** | रु./केव्हीए/महिना | ४० | ४५ | १२५ | १७८% | ५० | १२५ | ० |
| **उच्चदाब ५ (ब) कृषी इतर** | रु./केव्हीए/महिना | ४० | ४५ | १५० | २३३% | ५० | १५० | ० |

| वर्गवारी | एकक | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सद्याचे दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी प्रस्तावित दराच्या तुलनेत %बदल |
| | | मागणी दर | | | | मागणी दर | | |
| **उच्चदाब ६ एकगठ्ठा गृहसंकुल पुरवठा (रहिवासी)** | रु./केव्हीए/महिना | २२० | २२० | ४६० | १०९% | २२० | ४६० | ० |
| **उच्चदाब ८(अ) तात्पुरता पुरवठा (धार्मिक प्रयोजन)** | रु./जोडणी/महिना | ३३० | ३५५ | ७४५ | ११०% | ३८५ | ७४५ | ० |
| **उच्चदाब ८(ब) तात्पुरता पुरवठा (अन्य प्रयोजन)** | रु./केव्हीए/महिना | २९० | २९० | ६१० | ११०% | २९० | ६१० | ० |
| **उच्चदाब ९ (अ) सार्वजनिक सेवा (शासकीय)** | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५६५ | १०९% | २९० | ५६५ | ० |
| **उच्चदाब ९ (ब) सार्वजनिक सेवा(इतर)** | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५६५ | १०९% | २९० | ५६५ | ० |
| **उच्चदाब १० वीजेवर चालणाऱ्या वाहनांकरिता चार्जींग स्टेशन/सेंटर्स** | रु./केव्हीए/महिना | | | ५६५ | | | ५६५ | ० |

| वर्गवारी | एकक | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सद्याचे दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी मंजुर दराच्या तुलनेत %बदल |
| **लघुदाब १- घरगुती** | | | | | | | | |
| **लघुदाब १ (अ)घरगुती बीपीएल** | रु./महिना | १२ | १३ | १५ | १५% | १५ | १५ | ० |
| **लघुदाब १ (ब) घरगुती** | | | | | | | | |
| ०-१०० युनिट | रु./महिना | ६० | ६५ | १४० | ११५% | ७० | १४० | ० |
| १०१-३०० युनिट | रु./महिना | ६० | ६५ | १७० | १६२% | ७० | १७० | ० |
| ३०१-५०० युनिट | रु./महिना | ६० | ६५ | १९० | १९२% | ७० | १९० | ० |
| ५०१-१००० युनिट | रु./महिना | ६० | ६५ | २०५ | २१५% | ७० | २०५ | ० |
| १००० युनिट पेक्षा अधिक | रु./महिना | ६० | ६५ | २२० | २३८% | ७० | २२० | ० |
| ३ फेज जोडणी * | रु./महिना | १७० | १८५ | ४०० | ११६% | २०० | ४०० | ० |
| **लघुदाब २ बिगर घरगुती** | | | | | | | | |
| (अ) ० - २० किलोवॅट | रु./महिना | २५० | २७० | ५८० | ११५% | २९० | ५८० | ० |
| (ब) >२० किलोवॅट ते <=५० किलोवॅट | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५८० | ११५% | २९० | ५८० | ० |
| (क) ५० किलोवॅट पेक्षा अधिक | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ५८० | ११५% | २९० | ५८० | ० |
| **लघुदाब ३ सार्वजनिक पाणी पुरवठा** | | | | | | | | |
| (अ) ० - २० किलोवॅट | रु./केव्हीए/महिना | ७५ | ८० | १७० | ११३% | ८५ | १७० | ० |
| (ब) >२० किलोवॅट ते <=४० किलोवॅट | रु./केव्हीए/महिना | ८५ | ९० | १९५ | ११७% | १०० | १९५ | ० |
| (क) ४० किलोवॅट पेक्षा अधिक | रु./केव्हीए/महिना | १२५ | १३५ | २९० | ११५% | १४५ | २९० | ० |
| **लघुदाब ४ कृषीपंप** | | | | | | | | |
| **लघुदाब ४ (ब) कृषीपंप मीटर सहीत** | रु/अ.श./महिना | २२ | २४ | ५० | १०८% | २६ | ५० | ० |
| **लघुदाब ४ (क) कृषी इतर** | रु./केडब्ल्यू/महिना | ६० | ६५ | १४० | ११५% | ७० | १४० | ० |

* रु./ १० किलोवॅट वरील ग्राहकांना रु.१६० प्रति १० किलोवॅट किंवा समप्रमाणात अतिरीक्त स्थिर आकार देय असेल

| वर्गवारी | एकक | आ.व.१७-१८ | आ.व.१८-१९ | | | आ.व.१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सद्याचे दर | मंजुर दर | प्रस्तावित दर | मंजुर दराच्या तुलनेत %बदल | मंजुर दर | प्रस्तावित दर | आ. व. १८-१९ साठी मंजुर दराच्या तुलनेत %बदल |
| **लघुदाब ५ (अ) औद्योगिक यंत्रमाग** | | | | | | | | |
| (१) ०-२० किलोवॅट | रु./जोडणी/महिना | २५० | २७० | ५८० | ११५% | २९० | ५८० | ० |
| (२) २० किलोवॅट पेक्षा अधिक | रु./केव्हीए/महिना | १७० | १८५ | ४०० | ११६% | २०० | ४०० | ० |
| **लघुदाब ५ (ब) औद्योगिक इतर** | | | | | | | | |
| (१) ०-२० किलोवॅट | रु./जोडणी/महिना | २५० | २७० | ५८० | ११५% | २९० | ५८० | ० |
| (२) २० किलोवॅट पेक्षा अधिक | रु./केव्हीए/महिना | १७० | १८५ | ४०० | ११६% | २०० | ४०० | ० |
| **लघुदाब ६ पथदिवे** | | | | | | | | |
| (अ) ग्रामपंचायत, अ,ब आणि क श्रेणीच्या नगरपालिका | रु./केडब्ल्यू/महिना | ६० | ६५ | १४० | ११५% | ७० | १४० | ० |
| (ब) महानगरपालिका | रु./केडब्ल्यू/महिना | ६० | ६५ | १४० | ११५% | ७० | १४० | ० |
| **लघुदाब ७- तात्पुरता पुरवठा** | | | | | | | | |
| (अ) तात्पुरत्या जोडण्या (धार्मिक प्रयोजन) | रु./जोडणी/महिना | ३३० | ३५५ | ७६५ | ११५% | ३८५ | ७६५ | ० |
| (ब) तात्पुरत्या जोडण्या (अन्य प्रयोजन) | रु./जोडणी/महिना | ३६० | ३६० | ७७५ | ११५% | ३६० | ७७५ | ० |
| **लघुदाब-८ जाहिराती आणि प्रसिध्दी फलक** | रु./जोडणी/महिना | ५७५ | ५७५ | १२३५ | ११५% | ५७५ | १२३५ | ० |
| **लघुदाब ९ - स्मशानभुमी व दफनभुमी** | रु./जोडणी/महिना | ३३० | ३५५ | ७६५ | ११५% | ३८५ | ७६५ | ० |
| **लघुदाब-१० (अ) सार्वजनिक सेवा-शैक्षणिक संस्था व रुग्णालये** | | | | | | | | |
| (i) ० ते २० किलोवॅट | रु./जोडणी/महिना | २२० | २३५ | ५०५ | ११५% | २५० | ५०५ | ० |
| (ii) >२० ते <= ५० किलोवॅट | रु./केव्हीए/महिना | २२० | २३५ | ५३० | १२६% | २५० | ५३० | ० |
| iii) ५० किलोवॅट पेक्षा अधिक | रु./केव्हीए/महिना | २२० | २३५ | ५५० | १३४% | २५० | ५५० | ० |
| **लघुदाब-१० (ब) सार्वजनिक सेवा-इतर** | | | | | | | | |
| (i) ० ते २० किलोवॅट | रु./जोडणी/महिना | २५० | २७० | ५८० | ११५% | २९० | ५८० | ० |
| (ii) >२० ते <= ५० किलोवॅट | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ६१० | १२६% | २९० | ६१० | ० |
| iii) ५० किलोवॅट पेक्षा अधिक | रु./केव्हीए/महिना | २५० | २७० | ६३५ | १३५% | २९० | ६३५ | ० |
| **लघुदाब ११ वीजेवर चालणाऱ्या वाहनांकरिता चार्जींग स्टेशन/सेंटर्स** | रु./केव्हीए/महिना | | | ५८० | | | ५८० | ० |

महावितरण मा. आयोगास विनंती करते की, त्यांनी या प्रस्तावातील वीजदर पध्दती, नवीन प्रस्तावित ग्राहक श्रेणी व इतर सूचनांचा विचार करून वीजदर मंजुर करावेत.

**ओ) प्रार्थना**

सन्माननीय आयोगास महावितरण कंपनीची आदरपुर्वक प्रार्थना आहे की,

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षिय वीजदर) विनियमच्या वेळोवेळी सुधारणा केलेल्या तरतुदीनुसार सुधारित मध्यावधी आढावा याचिका मा. आयोगाने पुढील कार्यवाहीसाठी दाखल करुन घ्यावी.
२. महावितरण कंपनीने आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०१९-२० साठी प्रस्तावित केलेली एकूण महसुलाची गरज व एकूण महसुली तुट इतर दाव्यांसह वसुल करण्यात परवानगी द्यावी.
३. आर्थिक वर्ष २०१५-१६ ते २०१९-२० ची महसुल तुटीवरील वसुली खर्चास (Carrying Cost) परवानगी दयावी.
४. महावितरणने प्रस्तावित केलेल्या वीजदरांची तत्वे व इतर सुचनांचा विचार करुन महसुली तुटीच्या वसुलीस व वीजदर पत्रकास मंजुरी मिळावी.
५. आर्थिक वर्ष २०१४-१५ व २०१५-१६ च्या कृषीपंपासाठीच्या वीज विक्रीस (Ag Sale) कोणत्याही कपातीशिवाय मंजुरी दयावी.
६. महावितरण ने प्रस्तावित केलेले प्रवर्ग निहाय वीजदर मंजूर करण्यात यावेत.
७. महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे बिलींग डिमांडच्या निकषामध्ये बदल करण्यास परवानगी दयावी.
८. उच्चदाब ग्राहकांना केव्हीएएच (kVAh) वापराप्रमाणे देयक देण्यास परवानगी दयावी.
९. वीजेवर चालणा-या वाहनांसाठीच्या प्रभारण केंद्रांसाठी (Charging Stations) महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे वेगळया वीजदरासह स्वतंत्र वर्गवारी निर्माण करण्यास परवानगी द्यावी.
१०. महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे ठराविक उच्चदाब वर्गवारीमध्ये नवीन ग्राहकांसाठी वेगळी उपवर्गवारी निर्माण करण्यास परवानगी द्यावी.
११. महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे उच्चदाब वर्गवारीतील सध्याच्या ग्राहकांना त्यांच्या वाढीव वीजवापरावर सवलत देण्यास परवानगी द्यावी.
१२. विशेष आर्थिक क्षेत्रातील (SEZ) जे ग्राहक महावितरणकडे वीजपुरवठयाची मागणी करतील अशा ग्राहकांना अ.क्र. १० मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे नवीन उपवर्गवारीनुसार वीजदर आकारणी करण्यास परवानगी द्यावी.
१३. वर प्रस्तावित केलेल्या प्रोत्साहन / सवलतींना वार्षिक महसुली खर्चाचा भाग म्हणून मान्यता द्यावी.
१४. ग्राहकांना सध्या उपलब्ध असलेल्या विविध प्रोत्साहनांची सवलतींची महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे सुसूत्रीकरण करण्यास मान्यता द्यावी.
१५. महावितरणने प्रस्तावित केलेल्या टी.ओ.डी. (ToD) आकाराच्या बदलास अनुमती दयावी.
१६. आ. व. १८-१९ ते आ. व. १९-२० साठी मुक्त प्रवेश ग्राहकांसाठी क्रॉस सबसिडी अधिभार व इतर सर्व आकार जसे वहन आकार, वहन हानी आकार इ. साठी महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे वसुलीसाठी मान्यता द्यावी.
१७. आ. व. १८-१९ ते आ. व. १९-२० साठी स्व: वापरासाठीच्या वीज उत्पादकासह (CPP) सर्व मुक्त प्रवेश ग्राहकांकडून महावितरणने प्रस्तावित केल्याप्रमाणे अतिरिक्त अधिभार वसुल करण्यास मंजुरी द्यावी.
१८. स्वस्थापित स्ववापरासाठीच्या वीज उत्पादकांकरीता (CPP)लागु असलेल्या स्टँडबाय (राखीव) व्यवस्थेसाठीच्या आकारात वाढ करण्यास परवानगी द्यावी.
१९. विशेष आर्थिक क्षेत्र व रेल्वे हया परवाना धारकांना अतिरिक्त वीजपुरवठा व्यवस्था (Standby Arrengement)अनिवार्य करण्यासाठी नियामक तरतूद लागू करावी.
२०. वीजदर व्यवहार्यतेत महावितरणने सुचविलेले विविध प्रकाराच्या उपक्रमासाठीचे वर्गवारीकरण मंजुर करण्यात यावे.
२१. मा. आयोगाच्या कृती मानके विनियमामध्ये नमुद केलेल्या विद्युतदाबापेक्षा जास्त विद्युतदाबावर जोडणी असलेल्या ग्राहकांकडून विनियमामध्ये नमुद असलेल्या विद्युतदाबानुसार वहन आकार वसुल करण्याची परवानगी द्यावी.
२२. छपरावरील नुतनशील उर्जानिर्मिती यंत्रणा वापरणा-या ग्राहकांकडून त्यांच्या विद्युतदाबानुसार वहनआकार वसुल करण्यास परवानगी द्यावी.
२३. महावितरणने प्रस्तावित केलेल्या आकार पत्रकाला (Schedule of Charges) मान्यता द्यावी.
२४. महावितरणने सादर केलेल्या भांडवली खर्चाला (Capex & Capitalization) मंजुरी द्यावी.
२५. मा. आयोगास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही सहाय्य मंजुर करावे.
२६. मा. आयोगास योग्य वाटेल असे कोणतेही आदेश, प्रकरणातील परिस्थिती तसेच न्याय हिताच्या दृष्टीने देण्यात यावेत.
२७. कोणतीही चूक / भुल झाली असल्यास ती क्षमापित करावी आणि ती सुधारण्याची संधी देण्यात यावी.
२८. सदर विनंती अर्ज सादर कर्त्यास या अर्जात गरज असल्यास वेळोवेळी कोणतीही भर टाकण्यास किंवा त्यात बदल करण्यास तसेच अतिरिक्त माहिती सादर करण्यास परवानगी देण्यात यावी.

**सतिश चव्हाण**

**संचालक (वाणिज्य)**